महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ
सर ज.जी. कला शाळा आवार, डॉ दा.नौ. मार्ग, मुंबई- 400 001 . दुरध्वनी क्र. 022-22620304
Website: www.msbae.org.in Email: director.msbae@gmail.com

क्रमांक - मराकशिमं/शुल्क निश्चितीबाबत/२०२४/ १९१ दिनांक:- 07 AUG 2024

परिपत्रक

प्रति,

प्राचार्य,

विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित कला परिसंस्था

**विषय :- कला पदविका/प्रमाणपत्र अभ्यासक्रमांचे शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करीता शुल्क निश्चित करण्यासाठी संगणक प्रणालीद्वारे प्रस्ताव सादर करणे बाबत.**

महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाच्या अधिनियमात कलम २०(१) मध्ये शुल्क निश्चिती समितीची तरतुद केलेली आहे. तसेच कलम ४७(१) मध्ये शासनाने मान्यता दिलेल्या व मंडळाशी संलग्न असलेल्या विनाअनुदानित खाजगी कला संस्थांद्वारे चालविण्यात येणाऱ्या प्रत्येक पदविका स्तरीय अभ्यासक्रमांचे कला शिक्षण देण्याचा वास्तव खर्च ठरविण्यासाठी शासन शुल्क निश्चित समिती गठित करेल असे नमूद आहे. तसेच कलम ४७ (२) मध्ये महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनीयमन) अधिनियम २०१५ मधील कलम १४ व १५ नुसार शुल्क निश्चितीसाठी अनुसरावयाची कार्यपद्धती व शुल्क संरचनेचे निर्धारण करण्याचे घटक नमूद केलेले आहेत.

सदर तरतुदीस अनुसरून शासनाने दिनांक १३.०३.२०२४ च्या आदेशान्वये शुल्क निश्चिती समिती गठित केलेली आहे. सदर शुल्क निश्चिती समितीची प्रथम बैठक दिनांक ०६.०६.२०२४ रोजी पार पडली असता, सदर बैठकीत शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करीता कला पदविका/प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे शुल्क निश्चित करण्यासाठी संगणक प्रणालीद्वारे कला संस्थांकडून प्रस्ताव मागविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

त्यास अनुसरून मंडळाशी संलग्नीत विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित कला पदविका/प्रमाणपत्र अभ्यासक्रमांचे तसेच, ज्या अनुदानित संस्थामध्ये विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित अभ्यासक्रम राबविण्यात येत आहेत. अश्या कला परिसंस्थेमधील विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित अभ्यासक्रमांचे शुल्क निश्चित करण्यासाठी दि. ०७.०८.२०२४ ते २६.०८.२०२४ पर्यंत ऑनलाईन पद्धतीने प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. मंडळाच्या www.msbae.org.in या संकेतस्थळावरून Admission मेन्यू मधून https://sss.msbae.in/ay2425/ या लिंकद्वारे अर्ज सादर करावेत.

शुल्क निश्चित समितीने प्रक्रिया शुल्क खालील प्रमाणे निश्चित केलेले आहे. प्रक्रिया शुल्क Payment Gateway द्वारे स्विकारण्यात येईल.

| अ.क्र. | अभ्यासक्रम | कालावधी (वर्ष) | प्रक्रिया शुल्क (रु.) |
|---|---|---|---|
| १ | मुलभूत | १ | ५०००/- |
| २ | कला शिक्षक प्रशिक्षण (अे.टी.डी.) | २ | ७५००/- |
| ३ | रेखा व रंगकला | ४ | १५०००/- |
| ४ | उपयोजित कला | ४ | १५०००/- |